# शुध्दीपत्रक

दिनांक ०३.०९.२०१९ रोजी **पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग** यांच्या आस्थापनेवरील **पोलीस शिपाई (गट-क)** ची पदे भरण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापक, महापरिक्षा पोर्टल यांचेमार्फत स्पर्धात्मक परिक्षेसाठी ऑनलाईन अर्ज मागविण्यात आले होते. हया जाहिरातीत स्पर्धात्मक परिक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशत: बदल करणे, पदांच्या एकूण संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार संबंधीत पोलीस घटक प्रमुखांना राहतील व त्यांचा निर्णय अंतिम असेल असे स्पष्ट करण्यांत आले होते. त्या अनुषंगाने त्यामध्ये पुढीलप्रमाणे बदल करण्यांत येत आहे :-

१. **मुद्दा क्रमांक ५ :-** "ऑनलाईन परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या" ऐवजी **"ऑफलाईन OMR basesd परिक्षेमध्ये पात्र ठरलेल्या"** असे वाचावे

२. **मुद्दा क्रमांक ११.१३ आणि १३.३** मध्ये "उमदेवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परिक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवारांनी निवडलेल्या पर्यायापैकी एकही परिक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल" हे शब्द वगळण्यात येत असून त्या ऐवजी **"उमेदवाराच्या परिक्षा प्रवेशपत्रावर नमूद केलेल्या लेखी परिक्षा केंद्रावर नमूद दिनांकास उमेदवारांनी लेखी परिक्षेसाठी हजर राहणे बंधनकारक आहे."**

३. सदरील जाहिरातीत जेथे जेथे "ऑनलाईन परिक्षा" असे नमूद केले आहे त्या सर्व ठिकाणी "ऑफलाईन परिक्षा" असे वाचावे.

४. **मुद्दा क्रमांक ८ :-** महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक राआधो ४०३९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ३१.०५.२०२१ अन्वये एसईबीसी हे आरक्षण रद्द करण्यांत आले आहे. त्यामुळे शासन निर्णय दिनांक ३१.०५.२०२१ व शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ०५.०७.२०२१ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार एसईबीसी या प्रवर्गासाठी आरक्षीत असलेल्या जागा अराखीव (खुल्या) प्रवर्गात समाविष्ठ करण्यात याव्यात. सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता दिलेले आरक्षण रद्द झाल्यामुळे ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते, त्यांच्याकरीता पुढीलप्रमाणे सूचना देण्यांत येत आहेत.

(i) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटिशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ०५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार एसईबीसी उमेदवारांचा अराखीव व ईडब्ल्युएस प्रवर्गातून विचारात करण्यांत यावा व असे करतांना एसईबीसीच्या ज्या उमेदवारांनी अराखीव प्रवर्गाकरीता विहीत करण्यांत आलेली वयोमर्यादा ओलांडली असेल त्यांच्याबाबतीत जाहिरातीत नमूद केल्याप्रमाणे मागासवर्गीयांना देय असलेल्या वयोमर्यादा व परिक्षा शुल्काची सवलत कायम ठेवण्यांत यावी.

(ii) मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील पिटिशन क्र.३१२३/२०२० प्रकरणी दिनांक ०५ मे २०२१ रोजी दिलेल्या न्यायनिर्णयानुसार भरती प्रक्रिया राबविण्याबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.बीसीसी २०२०/प्र.क्र.३२०/१६-ब, दिनांक ०५.०७.२०२१ मधील परिच्छेद क्र.७ मधील तरतूदीनुसार एसईबीसी वर्गाकरीता राखीव असलेली पदे अराखीव पदांमध्ये रुपांतरीत करुन व एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांकडून **'अराखीव'** अथवा **'आर्थिक दृष्टया मागास'** प्रवर्गाचा विकल्प घेवून पूर्व परिक्षेचे आयोजन करावे असे नमूद आहे.

(iii) उपरोक्त शासन निर्णयास अनुसरुन ज्या उमेदवारांनी सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्गाकरीता निश्चित केलेल्या आरक्षणांतर्गत आवेदनपत्र भरले होते अशा उमेदवारांना शासनाच्या धोरणानुसार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ अथवा अराखीव (खुला) यापैकी एक विकल्प निवडावा.

(iv) जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक (EWS) आरक्षणाचा लाभ घेण्यास इच्छुक / पात्र असतील तर त्यांनी संकेतस्थळावर जाऊन (EWS) विकल्प निवडावा.

(v) ४(iv) वगळता **EWS न निवडलेल्या** उमेदवारांनी संकेतस्थळावर जाऊन **अराखीव (खुला) हयावर क्लिक करुन अराखीव (खुला) पदाचा** विकल्प निवडावा.

(vi) एसईबीसी या प्रवर्गातील जे उमेदवार आर्थिक दुर्बल घटक हा विकल्प निवडतील त्या उमेदवारांनी शारिरीक चाचणीच्या वेळी आर्थिक दुर्बल घटकाबाबतचे प्रमाणपत्र सोबत आणावे. जे उमेदवार प्रमाणपत्र सादर करणार नाहीत, त्यांना पुढील भरती प्रक्रियेत सहभागी होता येणार नाही. तसेच त्यांना त्यावेळी प्रवर्गही बदलता येणार नाही.

(vii) **सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्गातील उमेदवारांना आर्थिकदृष्टया दुर्बल घटक आरक्षण अथवा अराखीव (खुला प्रवर्ग) विकल्पाबाबतच्या ईडब्ल्युएस प्रमाणपत्र व नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राबाबत शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.राआधो ४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, दिनांक ०६.०७.२०२१ मधील तरतूदीनुसार खालील प्रमाणे कार्यवाही करावी.**

**१. निवड प्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांनी अर्ज केलेल्या त्या जाहिरातीमध्ये ईडब्ल्युएस आरक्षण लागू आहे, अशा निवडप्रक्रियांमध्ये एसईबीसी उमेदवारांना ईडब्ल्युएस आरक्षण अनुज्ञेय करतांना, सन २०१८-१९ व सन २०१९-२० मधील परिक्षांसाठी मार्च २०२० पर्यंत ग्राहय असणारे ईडब्ल्युएस प्रमाणपत्र सादर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.**

**२. ज्या एसईबीसी महिला उमेदवार अराखीव (खुला) असा विकल्प देतील अशा महिला उमेदवारांनी संबंधीत पदाची / परिक्षेची जाहिरात (दोन किंवा अधिक टप्प्याची परिक्षा असल्यास पूर्व परिक्षेची) प्रसिध्द झालेला आहे, त्या जाहिरातीनुसार एसईबीसी आरक्षणासाठी प्राप्त केलेले नॉन क्रिमीलेअर (NCL) प्रमाणपत्र हे अराखीव महिला पदासाठी ग्राहय धरण्यांत यावे.**

(viii) आर्थिक दुर्बल घटक (EWS) व अराखीव (खुल्या) चा विकल्प घेण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर पोलीस कॉर्नर या बटणावर क्लिक केल्यानंतर पोलीस भरती-२०१९ वर क्लिक करावे. त्यानंतर Web link वर क्लिक करुन उमेदवारांनी ज्या घटकासाठी आवेदनपत्र सादर करण्यांत केलेले आहे त्या घटकासाठी URL देण्यात आलेला आहे, त्यावर क्लिक करावे व सूचनाप्रमाणे कार्यवाही करावी.

(ix) **विशेष सूचना :- प्रत्येक उमेदवारांनी वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर जाऊन त्यांनी ज्या घटकांतर्गत आवेदनपत्र सादर केलेले आहेत त्या घटकांतर्गत निवड करुन उमेदवारांनी स्वत:चा Password बदल करुन घ्यावा.**

(x) एसईबीसी प्रवर्गातून अर्ज केलेल्या उमेदवारांना **'अराखीव'** अथवा **'आर्थिक दृष्टया मागास'** प्रवर्गाचा विकल्प निवडण्याची सुविधा हे शुध्दीपत्रक प्रसिध्द झाल्यापासून म्हणजेच दिनांक .०५.०८.२०२१ पासून ते दिनांक १५.०८.२०२१ रोजी २४.०० वा.पर्यत उपलब्ध राहील.

3/8/21

**( अशोक दुधे )**
**पोलीस अधीक्षक, रायगड-अलिबाग**